सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक ३७४(२)/२०२२/१९ दिनांक:- ११ मे, २०२३

# -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :- महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ व महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२२ करीता उमेदवारांना प्रवेशाबाबत...**

**संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०१४/२०२३ व १५/२०२३, दिनांक २ मार्च, २०२३**

उपरोक्त पूर्व परीक्षेचा निकाल दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून मुख्य परीक्षा दिनांक १३ मे, २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे, २०२३ मधील तरतुदी विचारात घेता मुख्य परीक्षा प्रवेशाकरीता नव्याने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. या यादीत नमूद पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे.

३. तद्अनुषंगाने महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ करीता नव्याने प्रवेश दिलेले उमेदवार **भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, सेक्टर-३, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४** या परीक्षा उपकेंद्रावर तर विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ करीता नव्याने प्रवेश दिलेले उमेदवार **तेरणा इंजिनिअरींग कॉलेज, प्लॉट नं.१२, सेक्टर-२२, नेरुळ रेल्वे स्टेशन समोर, नेरुळ (प), नवी मुंबई – ४०० ७०६, Part -B** या परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहू शकतात.

४. प्रवेशासंबंधात काही अडचण निर्माण झाल्यास उमेदवारांनी परीक्षेपूर्वी आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधावा. परीक्षेनंतर यासंदर्भात आलेल्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :-नवी मुंबई

उपसचिव, (परीक्षोत्तर-राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.